दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. २० ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १२० ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

## पावसाळी सहल ठरली जीवघेणी कुर्ल्यातील धबधब्यात बुडून मृत्यू

**नवी मुंबई :** खारघरमधील पांडवकडा धबधब्यात मंगळवारी संध्याकाळी एका १६ वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू झाला. या वर्षीच्या पावसाळ्यात या परिसरात बुडून मृत्यू होण्याची ही चौथी घटना आहे. मृत मुलाची ओळख प्रणव मिश्रा (१६) अशी असून तो कुर्ला येथील रहिवासी होता. सायंकाळी ५.४९ च्या सुमारास खारघर अग्निशमन केंद्राला प्रणव बुडाल्याची माहिती मिळाली, त्यानंतर एक फायर जीप आणि अग्निशमन दलाचे एक पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले.

## 20 ऑगस्टला 4 जिल्ह्यांना हवामान खात्याचा यलो अलर्ट

**मुंबई :** सध्या राज्यात पावसाचा जोर काहीसा कमी असला तरी २० ऑगस्ट रोजी अनेक भागांत पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, कोकणातील काही जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असून, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यातील ४ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## थोडक्यात वार्ता

### जायकवाडी टप्पा–2ला मंजुरी; मराठवाड्याच्या विकासाला दिशा!

**छत्रपती संभाजीनगर :** जायकवाडी टप्पा–२ला मंजुरी; मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा मिळाली असल्याचे आमदार विलास भुमरे यांनी सांगितले. जायकवाडी प्रकल्प टप्पा–२ साठी ₹६,४७७ कोटी ८८ लाखांच्या आर्थिक तरतुदीस मंजुरी मिळाल्याने मराठवाड्याच्या सिंचन विकासाला मोठी चालना मिळणार आहे. या प्रकल्पामुळे छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, बीड, परभणी आणि नांदेड या पाच जिल्ह्यांतील सुमारे १ लाख ३१ हजार ६५२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. माजलगाव धरणाच्या कामाला गती मिळण्यासोबतच शेती, औद्योगिक पाणीपुरवठा, मत्स्य व्यवसाय आणि विद्युत निर्मितीलाही फायदा होणार आहे.

### इमरान खान यांची 9 महिन्यांनंतर प्रथमच पत्नी आणि बहिणीशी भेट

**इस्लामाबाद :** पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) पक्षाचे संस्थापक इमरान खान यांनी रावळपिंडीतील अदियाला तुरुंगात तब्बल ९ महिन्यांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर प्रथमच पत्नी बुशरा बीबी आणि बहिणीची भेट घेतली.सर्वोच्च न्यायालयाने इमरान खान यांच्या ढासळत्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त करून त्यांच्या कुटुंबीयांना दर आठवड्याला भेटण्याची परवानगी दिल्यानंतर ही भेट शक्य झाली. मिळालेल्या माहितीनुसार, इमरान खान यांच्या बहिणी नोरिन नियाझी यांनी तुरुंगातील कॉन्फरन्स रूममध्ये त्यांच्याशी सुमारे १५ मिनिटे चर्चा केली. यावेळी दोघांमध्ये खान यांच्या प्रकृतीसह त्यांच्या कायदेशीर परिस्थितीवरही चर्चा झाली. नोरिन यांनी इमरान खान यांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची माहिती दिली. न्यायालयाने सरकारला इमरान खान यांना दोन दिवसांच्या आत वैद्यकीय तपासणीसाठी इस्लामाबाद येथील शिफा इंटरनॅशनल हॉस्पिटलमध्ये नेण्याचे आणि १६ सप्टेंबरपर्यंत त्यांना तिथेच ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

### कोंबडी खाद्याच्या गोण्यांमध्ये रेशनचा माल

**जळगाव :** कोंबड्यांच्या खाद्याचा छाप असलेल्या गोण्यांमध्ये शासकीय रेशनचा गहू आणि तांदूळ लपवून काळ्या बाजारात विक्रीसाठी वाहतूक करण्याचा प्रकार उघडकीस आला असून पारोळा पोलिसांनी कारवाई करत ७३.५४ क्विंटल धान्य आणि मालवाहू ट्रक असा एकूण ७ लाख १२ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे या प्रकरणी धान्याचा मालक सुभाष विठ्ठल वाणी (६१, रा. पारोळा) आणि फरार ट्रक चालकाविरुद्ध पारोळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे रेशनच्या धान्याची काळ्या बाजारात होणारी तस्करी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. पारोळा शहरातील सप्तर्षी मंगल कार्यालयासमोर आणि भाग्यश्री टोल कार्यालयाच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत संशयास्पद हालचाली सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी परिसरात पाहणी केली असता टाटा कंपनीचा केशरी रंगाचा मालवाहू ट्रक (एमएच १६ एई ६८६६) आढळून आला. पोलिसांनी ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये कोंबड्यांच्या खाद्याचे लेबल असलेल्या गोण्यांमध्ये गहू आणि तांदूळ भरलेला आढळून आला. ट्रकमध्ये १६२ गोण्या असल्याचे तपासात समोर आले. जप्त करण्यात आलेल्या धान्याची किंमत २ लाख १२ हजार ९७० रुपये, तर ट्रकची किंमत सुमारे ५ लाख रुपये आहे. संशयितांनी कोणताही वैध परवाना नसताना प्रशासनाची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने कोंबड्यांच्या खाद्याचे लेबल असलेल्या गोण्यांचा वापर केल्याचा पोलिसांचा प्राथमिक निष्कर्ष आहे. सुभाष वाणी आणि ट्रक चालकाने संगनमत करून रेशनचा हा साठा काळ्या बाजारात विक्रीसाठी वाहतूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पारोळा पोलीस शिपाई भूषण राजाराम पाटील यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला.

## तीन वर्षीय बालकासाठी बोरवेलच्या खड्ड्यातून चित्त थरारक रेस्क्यू ऑपरेशन यशस्वी

### कौसडी येथील बुधवारदुपार ची घटना; प्रशासन व ग्रामस्थांच्या अथांग परिश्रमाला यश

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

**परभणी:-** जिंतूर तालुक्यातील कौसडी शिवारातील शेतातील बोरवेलच्या खड्ड्यामध्ये पडलेल्या तीन वर्षे चिमुकल्याला अथांग प्रयत्नानंतर सुखरूप बाहेर काढण्यात प्रशासनाला दिनांक 19 ऑगस्ट बुधवार रोजी यश आले.

अदियान नदीम शेख असे रेस्क्यू करण्यात आलेल्या चिमुकल्या बालकांचे नाव असून त्याला पुढील उपचारासाठी तातडीने परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. जिल्हा सामान्य रुग्णालययेथे इलाज उपचार चालू आहे.

अधिक माहिती अशी की दिनांक 19 ऑगस्ट बुधवार रोजी दुपारी एक वाजून चा सुमारास कौसडी शिवारातील गट क्रमांक 25 मध्ये बालक व आई सोबत शेतात गेले होते शेतामध्ये हळदीची खुरपणी इतर कामे सुरू असतानाच बालक आईच्या जवळपास शेतामध्ये खेळत असतानाच आईची नजर चुकून बोरवेलच्या खड्ड्याकडे गेले बाळाच्या रडण्याचा आवाज आल्याने आईची खड्याकडे कडे लक्ष गेले आईने जिवाचा आकांताने ओरडण्यास सुरुवात करून जवळच असलेल्या सर्व नातेवाईकांना ही माहिती देण्यात आली व जवळच असलेल्या गावातील लोकांना भ्रमणध्वनीद्वारे ही माहिती देण्यात आली. थोड्याच वेळात गावातील शेकडो ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले व बचाव कार्याला जोरदार सुरुवात केली त्यानंतर घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन आरोग्य विभाग महसूल विभाग कर्मचारी व अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली यामध्ये कौसडी बोरी जिंतूर तसेच परभणीतील अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि युद्धपातळीवर रेस्क्यू ऑपरेशन ची मोहीम सुरू करण्यात आली जिल्हा प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेत बचाव कार्याला आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन केले परभणीचे जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी नतिषा मातुर जिंतूर चे तहसीलदार शितल



कचवे नायब तहसीलदार प्रशांत राखे हे स्थानिक प्रशासनाच्या सातत्याने संपर्कात राहून बचाव कार्याचा आढावा घेत होते जिल्हा शैलेश चिकित्सक डॉक्टर निळकंठ भोसीकर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर किशोर सुरवसे तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर बाबासाहेब जाधव आयुष अधिकारी डॉक्टर गजानन परळीकर तसेच गट विकास अधिकारी सुभाष मानकर यांनी घटनास्थळी उपस्थित राहून आवश्यक कारवाई केली.

यावेळी कसडीचे सरपंच शेख मोबीन ग्रामपंचायत सदस्य प्रतिष्ठित नागरिक तसेच ग्रामस्थांनी बचाव कार्यात मोठे योगदान दिले परिसरातील विविध गाव मधून आलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती अखेर आथंग परिश्रमानंतर या बालकाला सुखरूप बाहेर काढण्यात प्रशासनाला व ग्रामस्थांना यश आले असून त्यानंतर त्या चीमुकल्या बालकाला रुग्णवाहिकच्या साहाय्याने तातडीने जिल्हा सामान्य रुग्णात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

बाळ सुखरूप असून बाळाची योग्य ती खबरदारी घेतली जात असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर निळकंठ भोसीकर यांनी दिली.

सदरील घटनेची माहिती मिळताच पंचक्रोशीतील कौसडी येथे मोठ्या संख्येने जमा झाले होते प्रशासनातील अधिकारी कर्मचारी ग्रामस्थ आणि नागरिकांनी आपल्या परीने शर्तीचे प्रयत्न केले या घटनेतून संकटाच्या काळात माणुसकी अजूनही जिवंत असल्याचा प्रत्येक आल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली सदरील बालकाच्या रेस्क्यू ऑपरेशन दरम्यान जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी तहसीलदार व नाय तहसीलदार यांनी सातत्याने पाठपुरावा करून परिस्थितीचा आढावा घेत आवश्यक त्या सूचना दिल्या आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी व गटविकास अधिकारी आणि स्थानिक प्रशासनातील अधिकारी व प्रत्येक घटनास्थळी उपस्थित राहून बचाव कार्य सहभागी झाले होते प्रशासनाच्या या तत्परतेचे ग्रामस्थांकडून कौतुक केले जात आहे.

### 15 कोटींच्या भूमिगत वीजवाहिनीने हर्सूल-जटवाडा मार्ग होणार सुरक्षित

## विद्युत खांब हटणार; वाहतूक कोंडी व अपघाताचा धोका कमी होणार आ. प्रदीप जैस्वाल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** हर्सूल कारागृह-जटवाडा ते स्मृतीवन या महत्त्वाच्या मार्गावरील विद्युत खांबांचा अडथळा आता दूर होणार आहे. या मार्गावर १५ कोटी रुपये खर्चून भूमिगत विद्युत पुरवठा करण्याच्या कामाचा शुभारंभ शिवसेनेचे आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या हस्ते करण्यात आला. या कामामुळे रस्त्यावरील सर्व विद्युत खांब हटविण्यात येणार असून, मार्ग अधिक सुरक्षित आणि अडथळामुक्त होणार आहे.



हर्सूल-जटवाडा-स्मृतीवन हा शहराला ग्रामीण भागाशी जोडणारा प्रमुख मार्ग आहे. भद्रा मारुती मंदिर तसेच परिसरातील शेतकरी आणि नागरिकांसाठी या रस्त्याचे महत्त्व मोठे आहे. या मार्गावर दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. रस्त्याच्या कडेला उभे असलेले विद्युत खांब वाहतुकीस अडथळा ठरत असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला होता. रात्रीच्या वेळी पथदिवे आणि सुरक्षित मार्गाचीही आवश्यकता होती.

या पार्श्वभूमीवर विद्युत पुरवठा भूमिगत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यावरील अडथळे दूर होऊन वाहतुकीचा प्रवाह सुरळीत होण्यास मदत होणार आहे. तसेच अपघाताचा धोका कमी होऊन नागरिकांना सुरक्षितपणे प्रवास करता येणार आहे. “विकासकामे करताना महापालिका, महावितरण आणि अन्य विभागांमध्ये समन्वय साधावा लागतो. नागरिकांना मूलभूत सुविधा देण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध असून, कामे दर्जेदार आणि मजबूत करण्यासाठी तत्पर आहोत,” असे आमदार प्रदीप जैस्वाल यांनी सांगितले.

## महिला ग्राम महसूल अधिकाऱ्यास पाचशे रूपयांची लाच घेताना पकडले

**हिंगोली :** तक्रारदार याने त्याच्या मालकीच्या शेतामध्ये एक वर्षापूर्वी बोरवेल घेतला असून सदर बोरवेलची सातबारा व नमुना नंबर 14 वर नोंद घेण्यासाठी पाचशे रुपयाची लाच घेताना कान्हेगाव येथील ग्राम महसूल अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने बुधवारी आखाडा बाळापूर येथे अटक केली.

कान्हेगाव सज्जाच्या ग्राम महसूल अधिकारी सुवर्णमाला वसंतराव शिरसाठ यांनी तक्रारदाराच्या शेतातील एक वर्षापूर्वी घेतलेल्या बोरवेल ची वेळ नोंद सातबारा व नमुना नंबर 14 वर नोंद करण्यासाठी पाचशे रुपयाची लाच मागितली होती. याप्रकरणी तक्रारदाराने हिंगोली येथील लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालयात तक्रार दाखल केली होती. लासलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने तक्रारीची पडताळणी केल्यानंतर दिनांक 19 ऑगस्ट रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने आखाडा बाळापूर येथे ग्राम महसूल अधिकारी सुवर्णमाला शिरसाठ यांच्या खाजगी कार्यालया जवळ सापळा रचला. यावेळी तक्रारदाराकडून पाचशे रुपयाची लाज घेताना ग्राम महसूल अधिकारी शिरसाठ यांना पथकाने रंगेहात पकडले आहे. याप्रकरणी आखाडा बाळापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अश्विनी जगताप, उपाधीक्षक विकास घनवट यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेश मलपिल्लू यांच्यासह राजाराम फुफाटे, गजानन पवार, विनोद पुंडगे योगिता अवचार चालक अकबर शेख यांनी केली आहे. मराठवाड्यात सर्वात जास्त लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाया केल्या आहेत.

### ऑपरेशन सिंदूरच्या माहितीपटावर पाकिस्तानचा गंभीर आरोप

**इस्लामाबाद :** पाकिस्तानच्या लष्कराने डिस्कव्हरीच्या ‘डिक्लासिफाइड' ऑपरेशन सिंदूर’ या डॉक्युमेंटरी मालिकेवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. या मालिकेत दाखवण्यात आलेल्या घटनाक्रमाचे चित्रण ‘अतिनाट्यमय, अतिशयोक्तीपूर्ण आणि एकतर्फी’ असल्याचा दावा पाकिस्तानच्या लष्कराने केला आहे. पाकिस्तानी लष्कराच्या मीडिया विंग इंटर-सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्स (आयएसपीआर) ने भारताकडून ‘ऑपरेशन सिंदूर’ला लष्करी यश म्हणून सादर करण्यात आल्यावर आक्षेप घेतला आहे. डॉक्युमेंटरी मालिकेत भारतातील वरिष्ठ राजकीय आणि लष्करी नेत्यांनी ऑपरेशन तसेच त्याच्या उद्दिष्टांबाबत सविस्तर माहिती दिल्यानंतर पाकिस्तानकडून ही प्रतिक्रिया आली आहे. आयएसपीआर ने म्हटले की, ‘मार्का-ए-हक’ला एक वर्षाहून अधिक काळ उलटून गेल्यानंतरही भारत कथितपणे ‘कटू सत्य’ स्वीकारण्यापासून दूर पळत आहे. पाकिस्तानी लष्कराच्या म्हणण्यानुसार, भारताने कथित अपयश स्वीकारण्याऐवजी इतिहास आपल्या सोयीने मांडण्याचा मार्ग निवडला आहे.

## खुलताबाद येथे २३ ऑगस्ट रोजी भव्य अखिल भारतीय मुशायरा

**खुलताबाद प्रतिनिधी :** हजरत ख्वाजा शेख मुंतजबुद्दीन जर जरी जर बख्श दुल्हा (रह.) यांच्या ७४०व्या वार्षिक उर्सनिमित्त दरगाह-ए-आलिया हजरत शेख बुरहानुद्दीन औलिया (रह.), खुलताबाद शरीफ, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ९ वाजता भव्य व ऐतिहासिक अखिल भारतीय मुशायऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या चार दशकांहून अधिक काळापासून सुरू असलेल्या या मुशायऱ्याने उर्दू साहित्य, संस्कृती व अदबच्या क्षेत्रात आपली स्वतंत्र आणि समृद्ध परंपरा जपली आहे.

या ऐतिहासिक काव्य मैफलीच्या अध्यक्षस्थानी बुरहानपूर येथील प्रसिद्ध शायर



नाईम अख्तर खादमी राहणार असून, मुशायऱ्याचे सूत्रसंचालन उत्तर प्रदेशातील देशातील प्रसिद्ध मुशायरा संचालक नदीम फारूक करणार आहेत. देशाच्या विविध भागांतून नामवंत व निवडक शायर या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार असून, त्यांच्या दर्जेदार व बहारदार काव्यरचनांनी रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध करण्याची अपेक्षा आहे.

मुशायऱ्यात तबरेज मुनव्वर राना (लखनऊ), इब्राहिम अली जिशान (जयपूर), सूफियान प्रतापगढी (प्रतापगढ), इसरार चंदेरी (दिल्ली), कयामुद्दीन कयाम (खरगोन), इब्राहिम सागर (धुळे), नजमुल हसन प्रतापगढी (प्रतापगढ), अता हैदराबादी (हैदराबाद), युसूफ राना (मुंबई) आणि जुबेर गौहर (परभणी) हे नामवंत शायर आपल्या काव्यरचना सादर करणार आहेत.


मान्यवरांना निमंत्रण

मुशायरा समितीचे अध्यक्ष शेख मुनीबुद्दीन मुजीबुद्दीन तसेच मोहम्मद इमरान आबिद जागीरदार यांच्या उपस्थितीत दर्गाह कमिटीचे अध्यक्ष एजाज अहमद, सदस्य अॅड. कैसरोद्दीन, मोहम्मद मतीन जहागीरदार, शेख कामरान मोईनुद्दीन व आवेश यांनी ( विभागीय आयुक्त जी श्रीकांत जिल्हाधिकारी विनय गौडा, कार्यकारी अधिकारी , निवासी जिल्हाधिकारी विधाते, माजी खासदार इम्तियाज जलील, माजी आमदार एम. एम. शेख, वक्फ बोर्ड छत्रपती संभाजीनगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी फैय्याज खान यांच्यासह जिल्ह्यातील विविध अधिकारी व प्रतिष्ठित नागरिकांना निमंत्रण पत्रिका देऊन कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले.)

साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे

कमिटी खुदामीन दरगाह जात, हद्द-ए-कला, खुलताबाद यांच्या वतीने सर्व साहित्यप्रेमी, उर्दू भाषाप्रेमी, रसिक श्रोते तसेच उर्दू अदबच्या चाहत्यांना या ऐतिहासिक मुशायऱ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजता आयोजित करण्यात आलेल्या या काव्य मैफलीत मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, तसेच उर्दू साहित्य व काव्याच्या या समृद्ध परंपरेचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### "शाल जोडे"




## साडेतीन वर्षांच्या चिमुकल्याची उरणमध्ये निघृण हत्या; पलंगावरून पडल्याचा रचला बनाव

### शवविच्छेदन अहवालानंतर नराधम सावत्र पित्याचं बिंग फुटले

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** उरण मध्ये लहान बालकाची हत्या झाल्याने एकच खळबळ उडाली आहे.तू माझा खरा पप्पा नाहीस, मला माझ्या खऱ्या पप्पांकडे जायचंय... अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुरडयाच्या या निष्पाप हट्टाचा संताप अनावर होऊन एका क्रूर सावत्र पित्याने त्याची अत्यंत निघृणपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना उरणमधील फणसवाडी (मोरा) येथे उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे हत्येनंतर मुलगा खेळताना पलंगावरुन पडून जखमी झाल्याचा बनाव रचून गुपचूप अंत्यसंस्कार उरकण्याचाही सावत्र पित्याचा डाव होता; मात्र मोरा सागरी पोलिसांच्या सतर्कतेने आणि शवविच्छेदन अहवालाने या हत्येचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी सावत्र पित्याला बेड्या ठोकल्या आहेत.

या घटनेतील मृत बालक मोक्ष (३ वर्षे ५ महिने) हा त्याची आई काव्या आणि तिचा दुसरा पती जितेंद्र प्रदीप भिसे (२८) यांच्यासह उरण-मोरा येथील फणसवाडी येथे राहत होता. मोक्ष हा जितेंद्र भिसे याचा सावत्र मुलगा असल्याने त्याला सतत किरकोळ कारणांवरुन मारहाण करुन त्याचा शारीरिक व मानसिक छळ करत होता. दिनांक १४ ऑगस्ट रोजी दुपारी घरात मोक्ष आणि जितेंद्र दोघेच होते. यावेळी मोक्षने आरोपी जितेंद्र याला तू माझा खरा पप्पा नाहीस, मला माझ्या खऱ्या पप्पांजवळ जायचं आहे, असा हट्ट धरला.

या निष्पाप शब्दांचा भयंकर राग आल्याने आरोपी जितेंद्रचे मानसिक संतुलन सुटले. त्यामुळे त्याने चिमुकल्या मोक्षचे डोके थेट भिंतीवर आपटले आणि लाकडी काठीने त्याच्या पायांवर बेदम मारहाण केली. तेवढ्यावरच न थांबता, त्याने मोक्षला सोफ्यावर पाडून त्याच्या छातीवर जोरात ठोसा (पंच) मारला. या जबर मारहाणीत मोक्षच्या बरगड्या तुटल्याने आणि डोक्याला गंभीर इजा झाल्याने त्याचा जागीच तडफडून मृत्यू झाला.

**अपघाताचा बनाव आणि अंत्यसंस्काराची घाई :** मोक्षचा मृत्यू झाल्यानंतर आरोपी जितेंद्रने दुपारी मुलगा घरात खेळताना अचानक पलंगावरुन खाली पडला व बेशुद्ध झाला, असा बनाव रचला. त्यानंतर मोक्षला तातडीने उरणमधील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दुपारी ४ वाजता मोक्षला तपासून मृत घोषित केले. मुलगा मृत पावल्याचे स्पष्ट होताच आरोपी जितेंद्रने पोलिसांना न कळवता व शवविच्छेदन न करता बालकावर परस्पर अंत्यसंस्कार उरकण्याची घाई सुरु केली.

**पोलिसांची सतर्कता आणि शवविच्छेदनाने उघड केली क्रूरता:-** या संशयास्पद हालचालींची माहिती मिळताच मोरा सागरी पोलिसांचे पथक फणसवाडी येथे दाखल झाले. पोलिसांना पालकांच्या भूमिकेवर संशय आल्याने त्यांनी तात्काळ मृतदेह ताब्यात घेऊन इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवून सुरुवातीला अकस्मात मृत्यू दाखल केला. दिनांक १५ ऑगस्ट रोजी रुग्णालयाकडून प्राप्त झालेल्या ऍडव्हान्स डेथ सर्टिफिकेटमध्ये मोक्षच्या डोक्याला गंभीर दुखापत, बरगडया फॅक्चर आणि जबर मारहाणीमुळे झालेला हत्येचा मृत्यू, असे डॉक्टरांनी धक्कादायक निष्कर्ष नोंदवले. वैद्यकीय अहवाल समोर येताच पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवताच आरोपी जितेंद्रने हत्येची कबुली दिली.

# सं पा द की य

## सत्तासंघर्ष, चिन्हाचा वाद आणि न्यायाची प्रतीक्षा

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण या चिन्हावरून सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेली सुनावणी महाराष्ट्राच्या राजकारणाला आणि घटनात्मक व्यवस्थेला नव्याने आकार देणारी ठरत आहे. ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी केलेला सखोल युक्तिवाद आणि त्यावर खंडपीठाने उपस्थित केलेले थेट प्रश्न यामुळे या कायदेशीर लढाईची तीव्रता अधिक वाढली आहे. राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष यातील फरक अधोरेखित करताना, जर हे चिन्ह दोन्हीपैकी कोणालाच देण्यासारखी स्थिती नसेल तर ते गोठवले जावे, ही ठाकरे गटाची मागणी या प्रकरणात एका महत्त्वाच्या वळणावर आणून ठेवणारी आहे. विधानसभा अध्यक्षांचे अधिकार, अध्यक्षांनी दिलेला निर्णय आणि सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार यावर न्यायमूर्तींनी उपस्थित केलेले प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत. अध्यक्षांचा निर्णय बेकायदेशीर ठरवून रद्द करणे वेगळे आणि न्यायालयीन अधिकारात थेट आमदारांना अपात्र ठरवणे वेगळे, हा न्यायमूर्तींनी उपस्थित केलेला मुद्दा या प्रकरणातील कायदेशीर गुंतागुंत स्पष्ट करतो. शिस्तभंगाच्या कारवाईचे उदाहरण देत न्यायालयाने मांडलेली भूमिका ही लोकशाहीतील सत्तासंतुलनाच्या आणि अर्ध-न्यायिक प्राधिकरणांच्या अधिकारांशी थेट जोडलेली आहे. दुसरीकडे, शिंदे गटाने विधिमंडळात बहुमत मिळवले असले तरी ते मूळ राजकीय पक्षात राहून मिळवले होते का, हा न्यायमूर्तींनी विचारलेला प्रश्न मूळ वादाच्या मुळाशी हात घालणारा आहे. राजकीय पक्षाची मान्यता आणि विधिमंडळातील संख्याबळ यातील सीमारेषा स्पष्ट झाल्याशिवाय या वादावर पडदा पडणे कठीण आहे. हा खटला केवळ एका पक्षाच्या नाव आणि चिन्हापुरता मर्यादित नसून, भविष्यात पक्षांतराच्या आणि पक्षांतर्गत बंडाच्या राजकारणाला कोणती दिशा मिळणार, हे ठरवणारा वस्तुपाठ ठरणार आहे. सर्वोच्च न्यायालयातील या प्रदीर्घ सुनावणीनंतर येणारा अंतिम निकाल महाराष्ट्राच्या राजकारणावर आणि देशातील पक्षांतरबंदी कायद्याच्या अंमलबजावणीवर दूरगामी परिणाम करेल. त्यामुळे सर्वपक्षीय आणि सामान्य जनतेचे लक्ष आता या ऐतिहासिक निर्णयाकडे लागले आहे.

## युवकांच्या कल्पकतेतून मृद व जलसंवर्धनाची डिजिटल लोकचळवळ

माती आणि पाणी ही केवळ नैसर्गिक संसाधने नाहीत, तर मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा आणि शाश्वत विकासाचा मूलभूत आधार आहेत. सुपीक मातीचे संवर्धन आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर ही आजच्या काळाची गरज बनली आहे. बदलते हवामान, अनियमित पर्जन्यमान, जमिनीची धूप आणि भूजल पातळीतील घट या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर मृद व जलसंधारणाचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. याच उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाने युवकांच्या कल्पकतेला डिजिटल माध्यमाची जोड देत 'रील फॉर सॉईल अँड वॉटर कन्झर्वेशन' या अभिनव राज्यव्यापी स्पर्धेचे आयोजन केले आहे.

**जलसंधारण सप्ताहातून लोकचळवळीचा जागर :** माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी 21 ऑगस्ट रोजी राज्यात 'जलसंधारण दिन' साजरा करण्यात येतो. यंदा 15 ते 21 ऑगस्ट 2026 या कालावधीत 'जलसंधारण सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त राज्यभर 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर', जलसंधारणाची शपथ आणि जनजागृतीपर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांना नव्या पिढीच्या सहभागाची जोड देण्यासाठी 'रील फॉर सॉईल अँड वॉटर कन्झर्वेशन' स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. आजच्या युवकांसाठी Instagram सारखी समाजमाध्यमे अभिव्यक्तीचे प्रभावी व्यासपीठ बनली आहेत. त्याच माध्यमाचा सकारात्मक आणि समाजोपयोगी वापर करून माती आणि पाणी संवर्धनाचा संदेश महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

**30ते 60 सेकंदांत द्यायचा संवर्धनाचा संदेश :** महाराष्ट्रातील 15 ते 30 वयोगटातील युवक-युवतींना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. स्पर्धकांनी मृद व जलसंधारणाशी संबंधित विषयावर 30 ते 60 सेकंदांची Instagram Reel तयार करायची आहे. रीलच्या सुरुवातीला तिचा उद्देश, स्पर्धकाचे संपूर्ण नाव आणि जिल्ह्याचे नाव नमूद करणे आवश्यक आहे. तयार केलेली रील स्वतःच्या Public Instagram Account वर पोस्ट करून मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकृत Instagram Account ला Tag करणे आवश्यक आहे. त्यासोबत #SaveSoilSaveWater हा अधिकृत हॅशटॅग वापरणे अनिवार्य आहे.

**कल्पकतेला विषयांचे विस्तृत आकाश :** माती संवर्धन आणि पाणी बचत या संकल्पनेला विविध अंगांनी मांडण्याची संधी या स्पर्धेत युवकांना मिळणार आहे. मृदसंधारण, जलसंधारण, मातीची धूप रोखणे, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळे, बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण, पर्यावरण संरक्षण, गावातील यशस्वी मृद व जलसंधारण कामे, पारंपरिक संवर्धन पद्धती तसेच माती व पाणी वाचविण्याच्या नाविन्यपूर्ण कल्पना अशा विविध विषयांवर रील तयार करता येईल. यामुळे केवळ स्पर्धाच होणार नाही, तर राज्यातील विविध भागांत राबविण्यात आलेली यशस्वी कामे, स्थानिक प्रयोग आणि पारंपरिक ज्ञानदेखील डिजिटल माध्यमातून समाजासमोर येण्यास मदत होणार आहे.

**लाईक्स'पेक्षा आशय आणि सामाजिक संदेशाला महत्त्व :** सोशल मीडियावरील स्पर्धा म्हटली की Likes आणि Followers यांना अधिक महत्त्व दिले जाते. मात्र या स्पर्धेत आशय, कल्पकता आणि सामाजिक संदेशाला प्राधान्य देण्यात आले आहे. स्पर्धेचे मूल्यमापन एकूण 100 गुणांमध्ये करण्यात येणार आहे. विषय व संदेशासाठी 30 गुण, कल्पकतेसाठी 25 गुण, प्रभावी सामाजिक संदेशासाठी 20 गुण, सादरीकरण व तांत्रिक गुणवत्तेसाठी 15 गुण आणि Instagram Engagement साठी १० गुण निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे केवळ Likes किंवा Followers च्या संख्येवर विजेता ठरणार नाही. तज्ज्ञ परीक्षण आणि Social Media Engagement यांचा समतोल साधून गुणवत्तापूर्ण रील्सची निवड केली जाणार आहे.

**विजेत्यांना पुरस्कार; मिळणार 'युवा मृद-जलदूत'ची ओळख :** युवकांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तरावर आकर्षक पुरस्कार प्रस्तावित करण्यात आले आहेत. प्रथम क्रमांकासाठी 25 हजार रुपये व गौरवचिन्ह, द्वितीय क्रमांकासाठी 15 हजार रुपये व गौरवचिन्ह, तर तृतीय क्रमांकासाठी 10 हजार रुपये व गौरवचिन्ह प्रस्तावित आहे. पात्र सहभागींना ई-प्रमाणपत्र देण्यात येणार असून विजेत्यांना विशेष 'युवा मृद-जलदूत' म्हणून गौरविण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातून किमान 250 रील्स आणि संपूर्ण राज्यातून 10 हजार रील्सचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हजारो युवकांनी या उपक्रमात सहभाग घेतल्यास समाजमाध्यमांद्वारे लाखो नागरिकांपर्यंत माती आणि पाणी संवर्धनाचा संदेश प्रभावीपणे पोहोचू शकतो.

**आजचे संवर्धन म्हणजे उद्याची सुरक्षितता :** पाण्याचा प्रत्येक थेंब आणि मातीचा प्रत्येक कण भावी पिढ्यांसाठी जपणे ही सामूहिक जबाबदारी आहे. शासनाच्या योजना आणि जलसंधारणाची कामे यांना लोकसहभागाची जोड मिळाल्यासच त्यांचे परिणाम अधिक व्यापक आणि शाश्वत होऊ शकतात. विशेषतः युवकांनी या चळवळीचे दूत बनणे ही काळाची गरज आहे. मोबाईलच्या पडद्यावर काही सेकंद दिसणारी एखादी कल्पक रील एखाद्या व्यक्तीला पाणी वाचविण्यास, पावसाचे पाणी साठविण्यास, वृक्ष लावण्यास किंवा आपल्या गावातील जलसंधारणाच्या कामात सहभागी होण्यास प्रेरित करू शकते. त्यामुळे ही स्पर्धा केवळ डिजिटल कंटेंट निर्मितीपुरती मर्यादित नसून 'डिजिटल जनजागृतीतून प्रत्यक्ष लोकसहभागाकडे' नेणारा अभिनव प्रयत्न आहे.

"एक Reel... मातीसाठी! एक Reel... पाण्यासाठी! एक Reel... सुरक्षित भविष्यासाठी!"

या संदेशातून युवकांनी आपल्या कल्पकतेला समाजहिताची दिशा देत माती आणि पाण्याच्या संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा. कारण आज वाचवलेली माती आणि पाणी हेच उद्याच्या समृद्ध, सक्षम आणि जलसुरक्षित महाराष्ट्राचे भक्कम अधिष्ठान ठरणार आहे.

—संकलन जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**टीसी हरवली आहे**

**गणेश अशोक सुरे रा. सीसारखेडा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर याची सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तळणी, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर, येथील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ वर्ग १२वी पास ची शाळा सोडण्याचा दाखला (टी. सी.) छत्रपती संभाजीनगर ते सिल्लोड या प्रवासात हरवली आहे. करिता सापडल्यास**

**9356958132 या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा**

# महा वॉकेथॉन : वॉक फॉर वॉटर - जलदूत बनून पाण्यासाठी चालूया

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :**-जलसंधारण दिनानिमित्त 'समृद्ध आणि हिरवागार महाराष्ट्र' हे स्वप्न साकार करण्यासाठी जलसंधारणाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याची गरज आहे. पाणी हे केवळ नैसर्गिक साधन नसून मानवी जीवन, शेती, उद्योग आणि पर्यावरणाच्या शाश्वत विकासाचा आधार आहे. त्यामुळे पाण्याचे संवर्धन, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर आणि पावसाचे पाणी जास्तीत जास्त जमिनीत मुरविणे ही काळाची गरज बनली आहे. याच उद्देशाने राज्यात जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी 'महा वॉकेथॉन–वॉक फॉर वॉटर' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २१ ऑगस्ट रोजी 'जलसंधारण दिन' साजरा केला जातो. यानिमित्ताने यंदा राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये २१ ऑगस्ट रोजी सकाळी महा वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून जलसंधारणाचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

जलसंधारणासाठी एक पाऊल...

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना या अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. 'महा वॉकेथॉन' ही केवळ चालण्याची मोहीम नसून पाणी वाचविण्याच्या सामूहिक संकल्पाची सुरुवात आहे. तरुण, विद्यार्थी, महिला, शेतकरी, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी आणि नागरिक अशा सर्व घटकांनी या उपक्रमात सहभागी होऊन जलसंधारणाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

'जलदूत बना' हा या मोहिमेचा प्रेरणादायी संदेश आहे. प्रत्येक नागरिकाने जलसंधारणाचा दूत बनून पाणी बचतीचा विचार आपल्या कुटुंबापासून, परिसरापासून आणि गावापासून सुरू करावा, अशी अपेक्षा आहे.

'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मूलमंत्र

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाचे प्रमाण चांगले असले तरी पावसाचे पाणी योग्य पद्धतीने अडवून ते जमिनीत जिरविणे आवश्यक आहे. जलसंधारणाच्या विविध उपाययोजनांमुळे भूजलपातळी वाढविणे, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविणे आणि दुष्काळाच्या संकटावर मात करणे शक्य आहे.

'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा केवळ घोषवाक्य नसून महाराष्ट्राच्या जलसुरक्षेचा मूलमंत्र आहे. शेततळी, नाला खोलीकरण, बंधारे, गाळ काढणे, जलपुनर्भरण, वृक्षारोपण आणि पाण्याचा कार्यक्षम वापर अशा विविध उपाययोजनांना लोकसहभागाची जोड मिळाल्यास त्याचे दीर्घकालीन सकारात्मक परिणाम दिसून येतील.

युवकांचा सहभाग ठरणार महत्त्वाचा

जलसंधारणाचा संदेश युवा पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी 'रील्स' स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करून युवकांनी जलसंधारण, पाणी बचत, पावसाचे पाणी साठविणे, जलपुनर्भरण आणि पर्यावरण संवर्धन यासारख्या विषयांवर सर्जनशील रील्स तयार करून या मोहिमेत सहभागी व्हावे.

आजची युवा पिढी समाजमाध्यमांशी मोठ्या प्रमाणावर जोडलेली आहे. त्यामुळे पारंपरिक जनजागृतीसोबत डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर केल्यास जलसंधारणाचा संदेश अधिक व्यापक पातळीवर पोहोचू शकतो. युवकांच्या कल्पकतेला आणि तंत्रज्ञानाच्या सामर्थ्याला जलसंधारणाच्या लोकचळवळीशी जोडण्याचा हा महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे.

चला, सहभाग नोंदवूया!

'महा वॉकेथॉन–वॉक फॉर वॉटर'मध्ये सहभागी होण्यासाठी राज्य शासनाच्या जाहिराती तसेच समाजमाध्यमांवर उपलब्ध असलेल्या अधिकृत QR कोडद्वारे नागरिकांनी नोंदणी करून सहभाग निश्चित करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमात सहभागी होणे म्हणजे जलसंधारणाच्या व्यापक जनजागृती अभियानाला प्रत्यक्ष हातभार लावणे होय.

या मोहिमेत प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. कारण पाण्याची उपलब्धता ही केवळ शासनाच्या योजनांवर अवलंबून नसून समाजाच्या सामूहिक कृतीवरही अवलंबून आहे. घरातील पाण्याची बचत, पावसाचे पाणी साठविणे, जलस्रोतांचे संरक्षण, वृक्षारोपण आणि पाण्याचा अपव्यय टाळणे अशा छोट्या-छोट्या कृतींमधून मोठा बदल घडविता येतो.

जलसंधारणाची लोकचळवळ उभी करूया

जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. गावागावांत जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, शहरांमध्ये पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन आणि शेतीमध्ये सूक्ष्म सिंचनाचा वापर यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

२१ ऑगस्टची 'महा वॉकेथॉन' ही या सामूहिक सहभागाची प्रभावी सुरुवात ठरू शकते. पाण्यासाठी टाकलेले प्रत्येक पाऊल भविष्यातील जलसुरक्षित महाराष्ट्राच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. त्यामुळे या अभियानात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन जलसंधारणाचा संदेश घराघरात, गावागावात आणि समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करूया.

चला, एकत्र येऊया...

जलदूत बनूया...

पाण्यासाठी चालूया...

'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मूलमंत्र जगवूया...

आणि जलसंधारणाच्या लोकचळवळीतून समृद्ध, हिरवागार व जलसुरक्षित महाराष्ट्र घडवूया!

**संकलन :** जिल्हा माहिती कार्यालय, परभणी

# सर्पदंश 'अधिसूचित आजार' म्हणून घोषित; प्रत्येक घटनेची नोंद बंधनकारक; एएसव्हीच्या साठ्यावरही शासनाचे लक्ष

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील सर्पदंशामुळे होणारे मृत्यू आणि अपंगत्व रोखण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, सर्पदंशाला 'अधिसूचित आजार' म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील शासकीय व खासगी रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये तसेच वैद्यकीय व्यवसायिकांना सर्पदंशाची प्रत्येक संशयित, संभाव्य किंवा निश्चित घटना आणि सर्पदंशामुळे झालेल्या मृत्यूची माहिती संबंधित आरोग्य प्राधिकरणाला देणे बंधनकारक राहणार आहे.

या निर्णयामुळे सर्पदंशाच्या घटनांचे प्रभावी संनियंत्रण, वेळेवर उपचार आणि सर्पविष प्रतिबंधक लस (एएसव्ही) उपलब्धतेचे नियोजन अधिक सक्षम होईल, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना सर्पदंशाचा धोका अधिक असतो. सर्पदंशाची विषबाधा ही जीवघेणी ठरू शकते. त्यामुळे वेळेत निदान, योग्य प्रथमोपचार, तातडीने रुग्णालयात दाखल करणे आणि आवश्यकतेनुसार सर्पविष प्रतिबंधक लस उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर सर्पदंशाच्या घटनांची शास्त्रशुद्ध नोंद ठेवून त्याआधारे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी शासनाने ही अधिसूचना लागू केली आहे.

आरोग्य संस्था आणि वैद्यकीय व्यवसायिकांनी त्यांच्या निदर्शनास आलेली किंवा उपचाराधीन असलेली सर्पदंशाची प्रत्येक संशयित, संभाव्य किंवा निश्चित घटना संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी अथवा जिल्हा शल्यचिकित्सकांना कळवणे आवश्यक राहणार आहे. गंभीर, प्राणघातक घटना तसेच सर्पदंशामुळे झालेल्या मृत्यूची माहिती उपलब्ध संवाद यंत्रणेद्वारे तात्काळ देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

ही माहिती आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली, एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रम किंवा शासनाने निश्चित केलेल्या अन्य अहवाल प्रणालीमध्ये नोंदवली जाणार आहे. त्यामुळे



राज्यातील सर्पदंशाच्या घटनांचा अद्ययावत व विश्वासार्ह माहिती-साठा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

सर्पदंश प्रतिबंध व नियंत्रणासाठी राज्यस्तरावर संचालक (रुग्णालये), तर जिल्हास्तरावर जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे. महानगरपालिका क्षेत्रात वैद्यकीय आरोग्य अधिकारी अथवा अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी नोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

या अधिकाऱ्यांमार्फत सर्पदंशाच्या घटनांचे संनियंत्रण, उपचार व्यवस्थेचा आढावा, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि आवश्यक माहितीचे संकलन केले जाणार आहे.

एएसव्हीच्या साठ्याची अद्ययावत नोंद

सर्पदंशावर उपचार करणाऱ्या प्रत्येक आरोग्य संस्थेला सर्पविष प्रतिबंधक लस (एएसव्ही) उपलब्धता, प्राप्ती, वापर आणि शिल्लक साठ्याची अद्ययावत नोंद ठेवावी लागणार आहे. आवश्यकता भासल्यास ही माहिती जिल्हा आरोग्य प्राधिकरणाला उपलब्ध करून द्यावी लागेल. सर्पदंशाच्या घटना अधिक असलेल्या भागात पुरेशा प्रमाणात एएसव्हीचा साठा उपलब्ध ठेवण्यासाठी यामुळे प्रभावी नियोजन करता येणार आहे.

सर्पदंशाच्या रुग्णाच्या नोंदीमध्ये दंशाची तारीख व ठिकाण, रुग्णाचे वय व लिंग, दंशाची परिस्थिती, विषबाधेची लक्षणे, करण्यात आलेले उपचार, देण्यात आलेल्या एएसव्हीच्या कुप्यांची संख्या, रुग्णाला अन्यत्र संदर्भित केले असल्यास त्याचा तपशील, उपचाराचा परिणाम आणि मृत्यू झाल्यास त्याची नोंद ठेवणे आवश्यक राहणार आहे.

घटनांच्या कारणांचा अभ्यास करून प्रतिबंधात्मक उपाय

सर्पदंशाच्या घटना आणि मृत्यूंचे नियमित संनियंत्रण करण्याबरोबरच घटनास्थळ, परिस्थिती, हंगाम आणि इतर संबंधित घटकांचा अभ्यास केला जाणार आहे. या माहितीच्या आधारे सर्पदंशाचे प्रमाण कमी करण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखता येणार आहेत.

सर्पदंश प्रतिबंध, तातडीने अहवाल देणे, प्रथमोपचार, वेळेवर संदर्भ सेवा आणि योग्य उपचार याबाबत जनजागृती करण्याची जबाबदारीही जिल्हा आरोग्य प्राधिकरणावर सोपविण्यात आली आहे.

'वेळेवर उपचार हाच जीव वाचविण्याचा मंत्र'

सर्पदंशाच्या रुग्णाला वेळेत योग्य उपचार मिळणे हा जीव वाचविण्यासाठी सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे सर्पदंशाच्या घटनांची नोंद, एएसव्हीचा पुरेसा साठा, तज्ज्ञ उपचारासाठी तातडीची संदर्भ सेवा आणि प्रभावी संनियंत्रण यावर शासनाचा भर आहे. 'सर्पदंशाची प्रत्येक घटना नोंदवूया, वेळेत उपचार देऊया आणि अनमोल जीव वाचवूया,' असा संदेश आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिला.

सर्पदंशावरील उपचार व व्यवस्थापन भारत सरकार, महाराष्ट्र शासन किंवा सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी निश्चित केलेल्या उपचार मार्गदर्शक तत्त्वांनुसार करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे सर्पदंश प्रतिबंध आणि उपचार व्यवस्थेला अधिक शिस्तबद्ध, तत्पर आणि परिणामकारक स्वरूप मिळणार असल्याचे मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

# एमजीएम विद्यापीठ आणि टोयोटा त्सुशो इंडिया यांच्यात सामंजस्य करार

## विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षण, आंतरवासिता, कौशल्यविकास व रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठ आणि टोयोटा त्सुशो इंडिया प्रा. लि. यांच्यात शिक्षण, उद्योग, संशोधन, कौशल्यविकास, आंतरवासिता (इंटर्नशिप) आणि रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. एमजीएम विश्वस्त कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ आणि टोयोटा त्सुशो इंडियाचे उपव्यवस्थापकीय संचालक ताईसुके ओयामा यांनी करारावर स्वाक्षरी केली.




यावेळी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. एच. एच. शिंदे, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, अधिष्ठाता डॉ. प्राप्ती देशमुख, केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती विभागाच्या प्रमुख तथा स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या संचालिका प्रो. डॉ. परमिंदर कौर धिंग्रा, संचालक डॉ. रणीत किशोर, प्राचार्या डॉ. विजया मुसांडे, संचालिका शुभा महाजन, संचालिका डॉ. अर्चना पंचे यांच्यासह टोयोटा त्सुशो इंडियाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कुलपती अंकुशराव कदम म्हणाले की, जपानने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून जिद्दीने स्वतःला उभे केले. जपानी समाजाची तंत्रज्ञानासोबतच शिस्त, संस्कृती आणि वेळेचे काटेकोर पालन करण्याची वृत्ती उल्लेखनीय आहे. भारत आणि जपान भविष्यात जगाचे नेतृत्व करणारे देश ठरतील. त्यामुळे हा सामंजस्य करार एमजीएम विद्यापीठासाठी अभिमानास्पद आणि महत्त्वपूर्ण आहे. टोयोटा त्सुशो इंडियामध्ये एमजीएम विद्यापीठाचे सहा विद्यार्थी सध्या आंतरवासिता म्हणून कार्यरत असून ते उत्तम काम करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

ताईसुके ओयामा यांनी हा करार केवळ औपचारिक नसून शिक्षण, उद्योग आणि समाजाच्या प्रगतीसाठी नव्या संधी निर्माण करणारा असल्याचे नमूद केले. एकत्रितपणे काम करून विद्यार्थी व समाजाच्या विकासाला चालना देण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ म्हणाले की, शिक्षण, संशोधन आणि नवोपक्रमाच्या क्षेत्रात दोन्ही संस्थांनी एकत्रितपणे पुढे जाण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, सातत्याने शिकण्याची वृत्ती आणि आवश्यक सॉफ्ट स्किल्स विकसित करण्यासाठी सहकार्य केले जाईल. भविष्यात विद्यार्थी व प्राध्यापकांच्या संस्थाभेटी आणि विविध शैक्षणिक उपक्रमांचेही नियोजन करण्यात येणार आहे.

या करारामुळे विद्यार्थ्यांना आंतरवासिता, औद्योगिक भेटी, प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि ऑन-द-जॉब प्रशिक्षणाच्या संधी मिळणार आहेत. तसेच जपानी कार्यसंस्कृती, भाषा व मूल्यांची ओळख करून देण्यासाठी अतिथी व्याख्याने, कार्यशाळा व मार्गदर्शन सत्रे आयोजित केली जाणार आहेत. विद्यार्थ्यांच्या पात्रतेनुसार आणि कंपनीच्या गरजेनुसार परिसर मुलाखतीद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावरही भर राहणार आहे. या करारासाठी प्रो. डॉ. परमिंदर कौर धिंग्रा यांनी पुढाकार घेतला.

# दिल्ली जल बोर्ड एसटीपी टेंडर प्रकरणात सत्येंद्र जैन यांच्यासह 6 जणांना अटक

**नवी दिल्ली, 19 ऑगस्ट :** दिल्ली जल बोर्डाच्या (डीजेबी) सांडपाणी प्रक्रिया केंद्रांच्या (एसटीपी) निविदा प्रक्रियेत कथित अनियमितता, तांत्रिक अटींमध्ये फेरफार आणि लाचखोरीच्या आरोपांप्रकरणी दिल्ली सरकारच्या भ्रष्टाचारविरोधी शाखेने (एसीबी) माजी जलमंत्री सत्येंद्र जैन यांच्यासह सहा जणांना अटक केली आहे.

अटक करण्यात आलेल्यांमध्ये दिल्ली जल बोर्डाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आणि आयएएस अधिकारी उदित प्रकाश राय, माजी कंत्राटी सल्लागार अंकित श्रीवास्तव, एएन एंटरप्रायझेसचे मालक नागेंद्र यादव, युरोटेक एन्व्हायर्नमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे मालक राजा कुमार कुर्रा आणि सृजनहारचे मालक पंकज वर्मा यांचा समावेश आहे. एसीबीच्या माहितीनुसार, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा तसेच भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली दाखल करण्यात आलेल्या एफआयआर क्रमांक 10/2024च्या तपासादरम्यान समोर आलेल्या पुराव्यांच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. दिल्ली सरकारच्या दक्षता संचालनालयाने केलेल्या तक्रारीनंतर 11 मे 2024 रोजी हे प्रकरण दाखल करण्यात आले होते. तपासादरम्यान दिल्ली जल बोर्डाच्या एसटीपींचे आधुनिकीकरण आणि क्षमता वाढविण्यासाठीच्या निविदा प्रक्रियेत काही विशिष्ट तांत्रिक अटी समाविष्ट करण्यात आल्याचे समोर आले. या अटींमुळे एका विशिष्ट तंत्रज्ञान पुरवठादार कंपनीला फायदा झाला आणि निविदेतील स्पर्धा मर्यादित करण्यात आल्याचा एसीबीचा आरोप आहे. एजन्सीच्या म्हणण्यानुसार, प्रस्तावित पायलट अभ्यास करण्यात आला नाही. तसेच वापरायच्या तंत्रज्ञान आणि माध्यमांबाबत प्रतिबंधात्मक अटी घालण्यात आल्या. प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या आवश्यक गुणवत्तेचे निकषही तांत्रिक अटींमध्ये समाविष्ट करण्यात आले नसल्याचा आरोप तपास यंत्रणेने केला आहे.

एसीबीने केलेल्या इलेक्ट्रॉनिक पुराव्यांच्या विश्लेषणात काही खासगी व्यक्ती आणि सरकारी अधिकाऱ्यांमध्ये निविदेच्या अटी, शुद्धिपत्रे आणि इतर कागदपत्रांबाबत चर्चा झाल्याचे आढळल्याचा दावा करण्यात आला आहे. या कागदपत्रांमध्ये करण्यात आलेले बदल नंतर एसटीपीच्या निविदेत समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## ज्युनियर कॉलेजच्या अन्यायकारक संच मान्यता रद्द कराव्या : खा. ज्योती ताई वाघमारे यांना निवेदन



हिंगोली |राज्यसभेच्या खासदार ज्योती ताई वाघमारे ह्या हिंगोली येथे आल्या असता त्यांची शिक्षक समन्वय संघाच्या पदाधिकारी यांनी भेट घेतली घेऊन शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी निवेदन दिले. यामध्ये प्रमुख विषय

राज्यातील गेली पन्नास वर्षे ज्युनियर कॉलेजच्या संच मान्यता राज्य शासनाच्या अधिनियम,नियम 1981 च्या सेवाशर्ती शासनादेश व राज्य मंडळांनी घालून दिलेल्या निकषाप्रमाणे होत होत्या.

मात्र या कार्यपद्धतीला एकाकी पद्धतीने छेद देत आता शै. वर्षे 2025- 26 च्या संच मान्यता देताना यावर्षी विद्यार्थी व शिक्षकावर अन्याय करणारे अनेक निकष समाविष्ट केल्याने, राज्यातील विद्यार्थ्यांचा अध्ययनाचा व वैयक्तिक मार्गदर्शनासाठी कालावधी कमी होत असून त्याशिवाय सुमारे दहा हजार ते बारा हजार जुनियर कॉलेज मधील शिक्षकांची पदे कमी होणार आहेत.

यामुळे राज्यात सर्व ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षकांमध्ये राज्य शासनाविरुद्ध प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

या संदर्भात राज्य शासनाने संच मान्यतेचे निकष पूर्वीप्रमाणे ठेवावे व राज्यात सर्वत्र जुनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांची विज्ञान विषयाची प्रात्यक्षिकांची बॅच पूर्वीप्रमाणे वीस विद्यार्थ्यांचीच ठेवावी.

तसेच तासिकांचा कालावधी पूर्वीप्रमाणेच असावा शैक्षणिक वर्ष 2025 -26 पासून ची संच मान्यता प्रचलित निकषाप्रमाणे करण्यात यावी व हजारो शिक्षकांना बेगर करणाऱ्या व जुनिअर कॉलेजमधील शिक्षकांची पदे कमी करणारी ही अन्यायकारक संच मान्यता तात्काळ स्थगिती देऊन योग्य ती कारवाई करून राज्यातील शिक्षकांना न्याय द्यावा अशी विनंती खासदार वाघमारे यांना निवेदनद्वारे केली.

यावेळी वाघमारे यांनी हा आपला प्रश्न शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याशी बोलून राज्यातील एकही शिक्षक अतिरिक्त किंवा त्यांच्यावर अन्याय होऊ देणार नाही तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुद्धा पत्र देऊन न्याय देण्यात येईल असे सांगितले.

यावेळी शिक्षक समन्वय संघाचे हिंगोली चे प्रा.आशिष इंगळे हे उपस्थित होते

## अब्दुल्ला पठाण यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या हिंगोली जिल्हा अल्पसंख्याक अध्यक्षपदी नियुक्ती



**हिंगोली :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या हिंगोली जिल्हा अल्पसंख्याक विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी अब्दुल्ला पठाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष एडवोकेट नाजेर काजी यांनी केलेल्या निवडीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्या हस्ते व हिंगोली जिल्हाध्यक्ष अनिल भाऊ पतंगे यांच्या हस्ते मुंबई येथे अब्दुल्ला पठाण यांना नियुक्तीपत्र बुधवारी प्रदान करण्यात आले.

यावेळी वसमत विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजूभैय्या नवघरे यांनी अब्दुल्ला पठाण यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांचे विचार तसेच पक्षाची ध्येयधोरणे जिल्ह्यातील तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सक्रियपणे कार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अल्पसंख्याक समाजाच्या विविध प्रश्नांना वाचा फोडून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी अब्दुल्ला पठाण यांच्या माध्यमातून प्रभावीपणे काम केले जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष अनिल पतंगे, हिंगोलीचे माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक नेहालभैय्या तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे वसमत कार्याध्यक्ष अमजद खान उर्फ नम्मू यांची उपस्थिती होती. अब्दुल्ला पठाण यांच्या नियुक्तीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून त्यांचे अभिनंदन होत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली अल्पसंख्याक विभागाची जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## जलसंधारण सप्ताह:प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेमुळे पाणलोट विकासात वाढ

छत्रपती संभाजीनगर, दि.19 (जिमाका)- जलसंधारण ही लहान लहान उपाययोजनांमधून साधली जाणारी मोठी किमया आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या लहान लहान उपाययोजनांनी जिल्ह्यात पाणलोट क्षेत्रात विकासात वाढ झाली आहे. जिल्ह्यात खुलताबाद, वैजापूर, छत्रपती संभाजीनगर, गंगापूर आणि पैठण या तालुक्यात ही कामे झाली आहेत. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक 2.0 अंतर्गत ही कामे घेण्यात आली आहेत. त्यात वैयक्तिक उत्पादन पद्धतीत शेतकऱ्यांना लाभ देण्यात येऊनही मोठ्या प्रमाणावर पाण्याची बचत करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. प्रत्येक थेंबाद्वारे मोठे उत्पादन (Per Drop More Crop) हे उद्दिष्ट साधण्यास यश आले आहे. याचा परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीवर तर झाला आहेच शिवाय शेतकऱ्यांच्या मातीची गुणवत्ता व पाणी बचतीवरही झाला आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक 2.0 या योजनेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर, वैजापूर, गंगापूर, पैठण, खुलताबाद या तालुक्यातील 62 गावांमध्ये एकून 678 कामे राबविण्यात आली. त्यात शेततळे, ग्रॅबियन स्ट्रकचर, दगडी बांध, सिमेंट नाला बांध, माती बांध, माती नाला बांध, बांधालगत समतल चर, रिचार्ज शाफ्ट इ. जलसंधारण उपचार राबविण्यात आले. गेल्या वर्षभरात ही कामे झाली. त्यावर 15 कोटी 27 लक्ष 35 हजार रुपये इतका खर्च झाला असून त्याद्वारे 2241.53 सहस्त्र घनमिटर इतकी साठवण क्षमता योजना अंमलात आल्यापासून निर्माण झाली आहे.

# करटुले कंटुले भाजी लागवड उत्पादक प्रगतिशील शेतकरी विजय जंगले पेडगाव यांचा सर्व शेतकरी बांधवांनी आदर्श घ्यावा यांच्या फार्महाउसला भेट द्या शेतकरीसेवक नितीन जाधव गोगलगावकर

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी






**परभणी :**-गौरक्षक सेना कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी च्या वतीने शेतकरी बांधवांनी आत्महत्या करू नये शेतकऱ्यांनी उत्पादन वाढवावे शेतकरी वाचला तर सर्वकाही चांगले राहील हे जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे वेगवेगळ्या ठिकाणी अशाच एक परभणी तालुक्यातील पेडगाव येथील प्रगतिशील शेतकरी यांच्या मातृछाया शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड व जैविक निविष्ठा संसाधन केंद्र प्रकल्प पेडगाव चे अध्यक्ष प्रगतिशील शेतकरी विजय जंगले यांच्या पेडगाव या ठिकाणी फार्म हाऊस शेती त भेट या शेतीमध्ये नऊ एकर शेतीमध्ये फक्त आणि फक्त जैविक निविष्ठा संसाधन केंद्राने हे सर्व शेती निसर्ग पद्धतीने कारण कोणताही कंपनीचा खत किंवा काहीच उपयोग घेत नाही सर्व काही जो स्वतः बनवून फवारण्या असो किंवा खत असो गांडूळ खत शेण खंडापासून बनवलेले गाईच्या शेणापासून बनवलेले वेगवेगळे खत गोमूत्र ता लिंबाचा पाला पपईचा पाला अनेक प्रकारच्या पासून बनवलेल्या औषधाचे फवारणी व शेतीसाठी लागणारे फक्त आणि फक्त निसर्ग कोणताही रोग न होऊ देता शेतात यांच्या फार्म हाऊस मध्ये आयुर्वेदिक केळी पपई संत्री मोसंबी चा बाग त्याच्यामध्ये चवळी बरबटी चे रोप झाडे आणि विशेष करून करटुले करटुले भाजी आहे आयुर्वेदिक औषध भाजीपाला आहे म्हणून या कटुल्याचा आयुर्वेदिक औषधासाठी सर्व उपयोगावर रामबाण विलाज आहे अशा पद्धतीचे शेती लोकांच्या हितासाठी आणि लोकांच्या जनतेच्या आरोग्य चांगले राहण्यासाठी नैसर्गिक उपचार पद्धतीने शेती करतात त्याचबरोबर या ठिकाणी गाईचंही संगोपन करतात गोमातेचे संरक्षण आयुर्वेदिक दूध गोमातेच्या शेणापासून खतापासून गौर्या धूप लागणारे धार्मिक कार्यासाठी उपयोगाचे उत्पादन करतात अशा कृषी क्षेत्रात परभणी जिल्ह्यातील विविध क्षेत्रात पुरस्कार शेतकरी कृषी चळवळीत काम करून शेतकऱ्यांना न्याय व शेतकऱ्यांनी अशा पद्धतीचा प्रगतिशील शेतकरी विजय जंगले यांचा सर्वांनी आदर्श घ्यावा आणि आवश्यक यांच्या फार्मसीला भेट द्या गौरक्षक सेना महाराष्ट्र राज्य संघटन मंत्री गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी भेट घेऊन त्यांची फार्म हाऊस माहिती व शेतकऱ्यांनी अशा पद्धतीचे शेतकरी उत्पादन वाढवण्याचे व शेतकरी सुखी राहायला पाहिजे या दृष्टिकोनाने यांचा आदर्श घ्यावा जय चव्हाण जय किसान जय शेतकरी जय बळीराजा जय शेतकरी उत्पादक जय प्रगतिशील शेतकरी जय गोमाता जय व संवर्धन जय गोपादक जय आयुर्वेदिक अशी माहिती राष्ट्रजन फाउंडेशन परभणी अध्यक्ष गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून पत्रकार द्वारे माहिती दिली

## छत्रपती संभाजीनगरात 8 व 9 ऑक्टोबरला अखिल भारतीय गांधी साहित्य संमेलन

### डॉ. विवेक सावंत संमेलनाध्यक्ष; प्रा. डॉ. पुरुषोत्तम अग्रवाल यांच्या हस्ते उद्घाटन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी यांच्या विचारांचे अधिष्ठान असलेल्या महात्मा गांधी मिशन आणि पुणे येथील महाराष्ट्र गांधी स्मारक निधी यांच्या संयुक्त विद्यमाने दुसरे अखिल भारतीय गांधी साहित्य संमेलन ८ व ९ ऑक्टोबर २०२६ रोजी एमजीएम परिसरात आयोजित करण्यात आले आहे. संमेलनाध्यक्ष म्हणून शास्त्रज्ञ, गांधी तंत्रज्ञान तज्ज्ञ व महाराष्ट्र नॉलेज कमिशनचे संस्थापक डॉ. विवेक सावंत यांची निवड करण्यात आली आहे. प्रसिद्ध हिंदी लेखक, समीक्षक व विचारवंत तसेच जेएनयूच्या भाषा विभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. पुरुषोत्तम अग्रवाल यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.




पहिले अखिल भारतीय गांधी साहित्य संमेलन २०२५ मध्ये पुणे येथे दिवंगत डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या नेतृत्वाखाली झाले होते. त्यावेळी संपादक व विचारवंत सुरेश द्वादशीवार यांनी संमेलनाध्यक्षपद भूषविले होते. यंदाचे संमेलन डॉ. कुमार सप्तर्षी नगरात होणार आहे.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष महात्मा गांधी मिशनचे सचिव, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती आणि ज्येष्ठ गांधीवादी अंकुशराव कदम आहेत. कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ व माजी कुलगुरू प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.

चार भाषांमध्ये विचारमंथन

संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे मराठी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी या चार भाषांमध्ये स्वतंत्र परिषदांचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय राष्ट्रवाद, आंतरराष्ट्रीय शांतता, लोकशाही, सामाजिक न्याय, सत्य व स्वातंत्र्य, मानवतावाद, अहिंसक सत्याग्रह, शाश्वत विकास, पर्यावरण आणि निर्भयता या विषयांवर शोधनिबंध सादर केले जाणार आहेत.

भारतासह कोरिया, जर्मनी, अमेरिका, श्रीलंका, दक्षिण आफ्रिका आणि कझाकिस्तान येथील गांधी विचार व विश्वशांतीचे अभ्यासक सहभागी होणार आहेत. तसेच गांधींचे नाव असलेल्या सहा विद्यापीठांच्या कुलगुरू व माजी कुलगुरूंची गोलमेज परिषद प्रथमच होणार आहे. विद्यार्थी व युवकांच्या सहभागावर विशेष भर असून सुमारे ६० टक्के प्रतिनिधी विद्यार्थी-युवक असतील. छायाचित्र प्रदर्शन, लघुपट व पटकथा लेखन, पोस्टर, पथनाट्य, निबंध स्पर्धा, गांधी संगीत, खादी महोत्सव आणि गांधी ग्रंथ प्रदर्शन असे विविध उपक्रमही आयोजित करण्यात आले आहेत. संमेलनास सुमारे ८५० प्रतिनिधी अपेक्षित आहेत.

## गटई कामगारांना लोखंडी पत्र्याचे स्टॉल व साहित्य खरेदीसाठी अनुदान

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत गटई कामगारांना ऊन, वारा व पावसापासून संरक्षण मिळावे तसेच त्यांच्या आर्थिक उन्नतीस हातभार लागावा, यासाठी १०० टक्के शासकीय अनुदानातून लोखंडी पत्र्याचे स्टॉल व चर्मोद्योगासाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी अनुदान देण्यात येते.

या कामगारांना व्यवसायासाठी सुरक्षित व सोयीची जागा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने समाजकल्याण विभागामार्फत दि. ३१ डिसेंबर १९९७ पासून ही योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत पात्र गटई कामगारांना लोखंडी पत्र्याचे स्टॉल उपलब्ध करून देण्यासोबतच चर्मोद्योगासाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी ५ हजार रुपये १०० टक्के शासकीय अनुदान देण्यात येते. या योजनेमुळे गटई कामगारांना व्यवसायासाठी आवश्यक सुविधा मिळून त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होत आहे.

पालकमंत्री श्रीमती मेघना साकोरे -बोर्डीकर यांच्या हस्ते जिल्ह्यातील पाच लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात लोखंडी पत्र्याचे स्टॉल व चर्मोद्योगासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी प्रत्येकी रुपये ५ हजार अनुदानाचे वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण तसेच सहाय्यक आयुक्त श्री. आर. एच. एडके उपस्थित होते.

## पीडब्ल्यूएनएसएटीतून 500 विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणासह वसतिगृहाची संधी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जेईई आणि नीट परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, या उद्देशाने फिजिक्सवाला (पीडब्ल्यू)ने 'फिजिक्सवाला नॅशनल स्कॉलरशिप कम ॲडमिशन टेस्ट' (पीडब्ल्यूएनएसएटी) २०२६ च्या चौथ्या आवृत्तीची घोषणा केली आहे. या परीक्षेसाठी नोंदणी मोफत असून इयत्ता पाचवी ते बारावीतील विद्यार्थी तसेच बारावी उत्तीर्ण पीसीएम आणि पीसीबी शाखेतील विद्यार्थी अर्ज करू शकतात.

पीडब्ल्यूएनएसएटी २०२६ मध्ये पात्र विद्यार्थ्यांना १०० टक्क्यांपर्यंत शिक्षण शुल्क माफीची शिष्यवृत्ती मिळणार असून, एकूण २.५ कोटी रुपयांपर्यंतची रोख पारितोषिके दिली जाणार आहेत. विशेष म्हणजे, गुणवत्तेच्या आधारे निवड होणाऱ्या अव्वल ५०० विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणासह वसतिगृहाची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे.




विद्यार्थ्यांना परीक्षेत सहभागी होण्यासाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन असे दोन्ही पर्याय उपलब्ध आहेत. ऑनलाइन परीक्षा १ ते १५ ऑक्टोबर २०२६ दरम्यान देता येईल. तर ऑफलाइन परीक्षा ३, ४, १० आणि ११ ऑक्टोबर रोजी देशभरातील पीडब्ल्यू विद्यापीठ, पाठशाळा आणि शिकवणी केंद्रांवर घेण्यात येणार आहे. परीक्षेचा निकाल नंतर जाहीर केला जाणार आहे. फिजिक्सवालाचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी अलख पांडे म्हणाले, "दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून राहू नये. पीडब्ल्यूएनएसएटीच्या माध्यमातून आर्थिक अडचणी कमी करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन आणि आत्मविश्वास देण्याचा आमचा प्रयत्न आहे."

दरम्यान, पीडब्ल्यूएनएसएटीमधील कामगिरीच्या आधारे निवडक विद्यार्थ्यांना जेईई आणि नीटच्या तयारीसाठी विशेष 'रँकर्स ग्रुप'च्या माध्यमातून अतिरिक्त शैक्षणिक मार्गदर्शन आणि मार्गदर्शनपर प्रशिक्षणही दिले जाणार आहे.

## शासकीय आर्थिक व्यवहारात नियमपालनाला प्राधान्य - प्रधान महालेखापाल सुहासिनी गोतमारे

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय आर्थिक व्यवहारांमध्ये अचूकता, पारदर्शकता आणि विहित नियमांचे काटेकोर पालन अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन प्रधान महालेखापाल सुहासिनी गोतमारे यांनी आज येथे केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांसाठी (DDO) आयोजित संयुक्त कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

महालेखापाल कार्यालय, जिल्हा कोषागार कार्यालय आणि सहसंचालक, लेखा व कोषागारे कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. आर्थिक व्यवहार अधिक सुसूत्र करण्यासाठी विविध यंत्रणांमधील समन्वय अधिक गरजेचा असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यशाळेला वरिष्ठ उपमहालेखापाल जितेन्द्र बी. गुप्ता, सहसंचालक रेहाना काझी, वरिष्ठ कोषागार अधिकारी वैजनाथ शेळके, वरिष्ठ लेखा अधिकारी डी. एन. कोतुरवार यांच्यासह जिल्हा कोषागार अधिकारी, अपर कोषागार अधिकारी, विविध विभागांचे आहरण व संवितरण अधिकारी आणि लेखा व कोषागार विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना श्रीमती गोतमारे म्हणाल्या की, आर्थिक व्यवहारांचे लेखांकन करताना योग्य लेखाशीर्षांचा वापर करणे आवश्यक आहे. त्यामुळे चुकीच्या नोंदी व चुकीचे लेखावर्गीकरण टाळणे, प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे वेळेत सादर करणे तसेच लेखाविषयक त्रुटींचे तातडीने निराकरण करणे याकडे आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष द्यावे.

कार्यशाळेत उपयोगिता प्रमाणपत्रे, जीएसटीसंदर्भातील बाबी, लेखांकन प्रक्रिया, चुकीचे लेखावर्गीकरण आणि प्रलंबित देयके अशा विविध आर्थिक व लेखाविषयक बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. वरिष्ठ उपमहालेखापाल जितेन्द्र बी. गुप्ता यांनी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या स्तरावर करावयाच्या लेखाविषयक कार्यवाहीबाबत मार्गदर्शन केले, तर सहसंचालक रेहाना काझी यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकोषागार अधिकारी सय्यद इरफान यांनी केले.

## गणित व इंग्रजी या मुख्य विषयाला शिक्षक नसल्याने विदयार्थ्यांचे नुकसान

# सोयगावच्या जिल्हा परिषद प्रशालेतील शिक्षकांची रिक्त पदे भरा

### नगरसेविका कुसुम दुतोंडे यांची मागणी;विद्यार्थ्यांचे होतंय नुकसान आंदोलनाचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१९ ऑगस्ट

सोयगाव जिल्हा परिषद प्रशालेत एकूण मंजूर शिक्षकांपैकी दहा पदे रिक्त आहे.यात माध्यमिकचे सात पैकी केवळ तीनच कार्यरत असून चार पदे रिक्त आहे गणित आणि इंग्रजी या दोन्ही मुख्य विषयाला शिक्षकच नसल्याने नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्यात यावी या मागणीचे निवेदन सोयगाव नगर पंचायतच्या नगरसेविका तथा महिला व बाल कल्याण सभापती कुसुम दुतोंडे यांनी गटविकास अधिकारी यांना दिले असून आंदोलनाचा ईशारा दिला आहे.सोयगाव येथील जिल्हा परिषद प्रशालेत ४९० विद्यार्थी आहे. विद्यार्थी संख्या चांगली आहे. परंतु सध्या शाळेत मुख्याध्यापक १ माध्यमिक शिक्षक ४ प्राथमिक शिक्षक १ लिपिक १ परिचर ३ अशी एकूण १० पदे रिक्त असून शालेय कामकाजावर परिणाम होऊन गुणवत्तेवर याचा परिणाम होत आहे. महत्वाचे विषय शिकवायला माध्यमिक शिक्षक नाहीत.



मोठ्या प्रमाणावर मुलींची संख्या अधिक आहे यामुळे बाहेर ठिकाणी मुलींचे शिक्षण न घेता स्थानिक जिल्हा परिषद शाळेला प्राधान्य दिले आता पालक वर्गात रिक्त पदांमुळे खूप नाराजी आहे. जर रिक्त पदे अशीच राहिली तर मुलींचे व मुलांचे शिक्षण अडसर होणार असून विद्यार्थी शैक्षणिक नुकसान होत आहे. तरी विद्यार्थी शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी मुख्याध्यापक व सर्व शिक्षक असे आवश्यक ६ व शिक्षकेतर आवश्यक पदे ४ अशी रिक्त असलेली पदे त्वरित भरण्याची मागणी सोयगाव नगर पंचायत च्या नगरसेविका तथा महिला व बाल कल्याण सभापती कुसुम राजू दुतोंडे यांनी गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्या कडे दि.१९ बुधवार रोजी लेखी निवेदन दिले यात लवकरच ही रिक्त पदे न भरल्यास तीव्र आंदोलन करण्याचा ईशारा देण्यात आला आहे.

इतर तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी नसल्याने शाळा बंद पडत आहे परंतु सोयगाव च्या जिल्हा परिषद प्रशालेत विद्यार्थी संख्या चांगली आहे त्यात मुलींची संख्या जास्त आहे.खाजगी शाळेत फी भरून शिकविण्याची पालकांची क्षमता नाही त्यामुळे जिल्हा परिषद शाळेत सर्वसामान्य गोर गरिबांची मुलं शिक्षण घेत आहे परंतु गणित आणि इंग्रजी सारख्या मुख्य विषयाचे शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे लवकर रिक्त पदे न भरल्यास आंदोलन केले जाईल असे नगरसेविका कुसुम दुतोंडे यांनी सांगितले.

## राजाबाजार येथे मोक्ष सप्तमी निर्वाण महोत्सव निमित्त 500 भाविकानी चढवला लाडु

**छत्रपती संभाजीनगर :** राजाबाजार येथील श्री खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिराच्या वतीने भगवान पार्श्वनाथ निर्वाण महोत्सव व १४वा गुरुवर उपकार दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

या पावन प्रसंगी आचार्य विनम्र सागरजी महाराज आर्यिका विमलश्री माताजी, आर्यिका विनेहश्री माताजी, आर्यिका वितपश्री माताजी, आर्यिका विशमश्री माताजी आणि आर्यिका विपुलश्री माताजी यांचे मंगल सान्निध्य लाभले. यावेळी सचलन पंचायत अध्यक्ष महावीर पाटनी सजय पहाडे यानी केले .

# व्याजासह वसुली केल्याच्या कारणावरून २१ वर्षीय तरुणावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** उधारीच्या पैशांवरून हर्सूल परिसरातील चेतनानगर भागात रविवारी रात्री उशिरा एक थरारक आणि रक्ताचा थरकाप उडवणारी घटना घडली. व्याजासह पैशांची वसुली केल्याच्या कारणावरून एका २१ वर्षीय तरुणावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला करण्यात आला असून, यामध्ये तरुण गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी हर्सूल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

प्रशिक सुभाष साळवे (वय २१, रा. चेतनानगर, हर्सूल) असे गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव असून, तो आपल्या आई-वडिलांसोबत याच परिसरात राहतो. शनिवारी रात्री ९ च्या सुमारास प्रशिक परिसरातील महानगरपालिकेच्या शाळेसमोर उभा होता. यादरम्यान, आरोपी अक्षय सोपान गायकवाड (वय २७, रा. चेतनानगर, हर्सूल) तिथे पोहोचला आणि त्याने प्रशिककडे पैशांची मागणी केली. प्रशिकनेही क्षणाचाही विलंब न करता स्वतःकडील १५ हजार ४०० रुपये त्याच्या स्वाधीन केले.

मात्र, पैसे दिल्यानंतर काही वेळातच प्रशिकने अक्षयकडे आपले पैसे परत मागितले. यावरून दोघांमध्ये वाद विकोपास गेला. "तू माझ्याकडून उधारीने घेतलेले पैसे व्याजासहीत वसूल केले आहेत, त्यामुळे मी तुला पैसे देणार नाही," असे म्हणत आरोपी अक्षयने प्रशिकसोबत वाद घालण्यास सुरुवात केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले.

आरोपी अक्षयने सुरुवातीला प्रशिकला शिवीगाळ करत हाताने आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता त्याने आपल्या कमरेचा बेल्ट काढून प्रशिकला बेदम मारले. त्यानंतर त्याच्याजवळील एका धारदार शस्त्राने (वस्तूने) प्रशिकच्या छातीवर डाव्या बाजूला वार केला, ज्यामुळे तो रक्तात थारोळून खाली कोसळला. दरम्यान, तिथे आलेला राकेश नावाचा मित्र मदतीसाठी धावला आणि त्याने कशीबशी प्रशिकची हल्लेखोराच्या तावडीतून सोडवणूक केली. त्यानंतर आरोपी अक्षय हा प्रशिक आणि त्याचा मित्र राकेश या दोघांनाही दमदाटी व शिवीगाळ करत घटनास्थळावरून पसार झाला.

या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या प्रशिकला तातडीने उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे त्याच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. प्रकृती स्थिर झाल्यानंतर प्रशिकने हर्सूल पोलीस ठाण्यात येऊन आरोपी अक्षयविरुद्ध कायदेशीर तक्रार नोंदवली. प्राप्त तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार निर्मला कोलते करीत आहेत. उधारीच्या वसुलीवरून झालेल्या या रक्तरंजित राड्यामुळे हर्सूल परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# छत्रपती संभाजीनगरचे गुलाबराव मगर यांची राज्य ग्रंथालय परिषदेवर निमंत्रित सदस्य म्हणून निवड

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम, १९६७ व महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सुधारणा) अधिनियम, २०२४ अन्वये गठित करण्यात आलेल्या 'राज्य ग्रंथालय परिषदे'वर छत्रपती संभाजीनगर येथील गुलाबराव आप्पाराव मगर यांची निमंत्रित सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्य ग्रंथालय परिषदेची सुधारित रचना करण्यात आली आहे. त्यानुसार राज्य ग्रंथालय परिषदेच्या बैठकीत सर्वानुमते मंजुरी मिळाल्यानंतर गुलाबराव आप्पाराव मगर यांच्यासह चार निमंत्रित सदस्यांचा परिषदेत समावेश करण्यात आला आहे. गुलाबराव मगर हे छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी असून, त्यांची राज्य ग्रंथालय परिषदेवर झालेली निवड ही त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची दखल मानली जात आहे. याबाबत ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने मगर यांना अधिकृत पत्राद्वारे कळविण्यात आले असून, परिषदेमध्ये होणाऱ्या बैठकींसाठी त्यांची उपस्थिती प्राधान्याने राहणार आहे. राज्य ग्रंथालय परिषदेवर निमंत्रित सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल गुलाबराव मगर यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे. त्यांच्या निवडीमुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या शैक्षणिक व ग्रंथालय क्षेत्राला प्रतिनिधित्व मिळाले आहे.

# शनिवारी महिलांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता क्षमता बांधणी कार्यक्रम 'यशोदा'

छत्रपती संभाजीनगर, दि. 19(जिमाका)-राष्ट्रीय व राज्य महिला आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांना कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाची ओळख निर्माण होऊन त्यासंदर्भातील 'यशोदा' कृत्रिम बुद्धिमत्ता क्षमता क्षमता बांधणी कार्यक्रम शनिवार दि.22 रोजी आयोजीत करण्यात आला आहे. हा कार्यक्रम तापडीया नाट्यमंदिर येथे दुपारी 2 ते सायं.6 या वेळात होणार आहे. महिलांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बदलत्या तंत्रज्ञानाची ओळख व त्यातून निर्माण होणाऱ्या संधींबाबत जागरूक करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने या एकदिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# पॉश'ची अंमलबजावणी न करणाऱ्या राज्यातील 672 कार्यालयांना कारणे दाखवा; परभणी जिल्ह्यात 439 कार्यालयांची तपासणी

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** कार्यस्थळी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम (पॉश अ‍ॅक्ट)-२०१३ मधील तरतुदी तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या आदेशानुसार पूर्तता केली आहे किंवा नाही, याची तपासणी राज्यातील शासकीय व खासगी कार्यालये, संस्था, कंपन्या तसेच त्यांच्या शाखांमध्ये महिला व बाल विकास विभागामार्फत जून २०२६ पासून सुरू करण्यात आली आहे. यासाठी राज्यभर ४ हजारांहून अधिक तपासणी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यात आतापर्यंत ३ हजार ५७९ शासकीय आणि ३ हजार २९६ खासगी कंपन्या व कार्यालयांची तपासणी करण्यात आली आहे. तपासणीदरम्यान 'पॉश' अधिनियमातील तरतुदींची पूर्तता न केलेल्या कार्यालयांना जिल्हास्तरावरून एकूण ६७२ कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. नोटीस बजावलेल्या कार्यालयांनी विहित मुदतीत आवश्यक ती पूर्तता न केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार ५० हजार रुपयांपर्यंत दंडाची कारवाई संबंधित जिल्हाधिकारी तथा पॉश अ‍ॅक्ट-२०१३ आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येणार आहे.

परभणी जिल्ह्यात ४३९ कार्यालयांची तपासणी

जिल्ह्यात आतापर्यंत १८४ शासकीय आणि २५५ खासगी कंपन्या व कार्यालयांची, अशा एकूण ४३९ आस्थापनांची तपासणी करण्यात आली आहे. यामध्ये 'पॉश' अधिनियमातील आवश्यक तरतुदींची पूर्तता न केलेल्या ६५ शासकीय आणि ८० खासगी कार्यालयांना आवश्यक ती पूर्तता करण्याबाबत जिल्हास्तरावरून सूचना देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील सर्व शासकीय व खासगी कार्यालये, संस्था, कंपन्या तसेच त्यांच्या शाखांनी 'पॉश अ‍ॅक्ट'-२०१३ मधील तरतुदी आणि मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक कार्यवाही करणे बंधनकारक आहे. यामध्ये केंद्र शासनाच्या 'शी-बॉक्स' (SHe-Box) पोर्टलवर कार्यालयाची नोंदणी, अंतर्गत तक्रार समितीची स्थापना व नोंदणी, समिती सदस्यांचे प्रशिक्षण, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, वार्षिक अहवाल सादर करणे आदी बाबींचा समावेश आहे. संबंधित कार्यालयांनी पोर्टलवरील माहिती अद्ययावत ठेवणेही आवश्यक आहे.

तपासणीदरम्यान वरील बाबींची पूर्तता केली नसल्याचे आढळून आल्यास संबंधित कार्यालये, संस्था व कंपन्यांविरुद्ध 'पॉश अ‍ॅक्ट'-२०१३ मधील तरतुदींनुसार नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे जिल्हा प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.

# गौर खून प्रकरणाचा तपास सीआयडी मार्फत करावा; रामदास आठवले यांची मागणी

हिंदु प्रकाश वार्ता. अशोक पवार

**परभणी :-** आंबेडकरी चळवळीचा परभणी जिल्हा हा बालेकिल्ला राहिलेला आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यात देखील या जिल्ह्यातील अनेक भीमसैनिकांनी सक्रिय सहभाग घेतला असून या जिल्ह्यातील मागासवर्गीय व सुवर्ण यांच्यातील संबंध मैत्रीपूर्ण असून काही ठिकाणी अन्याय अत्याचाराचे प्रमाण वाढले असून संतोष सावळे या तरुण कार्यकर्त्याची गावातील काही मंडळींना कट रचून चार चाकी वाहनाने धडक देऊन त्याचा खून करण्यात आला आहे या प्रकरणाचा तपास सीआयडी मार्फत करण्यात यावा अशी मागणी आपण मुख्यमंत्री तथा गृहमंत्री नामदार देवेंद्र फडवणीस यांच्याकडे करणार असल्याची माहिती केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदास रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेत दिली. केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले हे 19 ऑगस्ट बुधवार रोजी सकाळी साडेअकरा वाजता सावली शासकीय विश्रामग्रहयेथे पत्रकार परिषद घेऊन पूर्णा तालुक्यातील गौर येथील संतोष सावळे खून प्रकरणाच्या विषयी आपली भूमिका यावेळी रिपाई राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉक्टर सिद्धार्थ भालेराव राज्यसचिव डी एन दाभाडे जिल्हाध्यक्ष डॉक्टर विजय गायकवाड रानुबाई वायवल निवृत्ती हत्यांभिरे कैलास दाभाडे विजय सोनवणे जयप्रकाश हिंगोली लक्ष्मण बनसोडे उत्तम वावळे आदींची प्रमुख उपस्थिती होती यापुढे बोलताना नामदार आठवले म्हणाले की समाजातील दलित मराठा वाद न होता सर्व समाजाने एकत्रित गुण्यागोविंदाने नांदले पाहिजे मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही पहिली मागणी आपण केली असून एका नुसार ओबीसी ची नोंद असलेला मराठा समाजाला ओबीसी चे प्रमाणपत्र देण्यात यावे परंतु मनोज झालेले पाटील यांचे सरसकट ओबीसी प्रमाणपत्राची मागणी अयोग्य आहे केंद्रातील मोदी सरकारने आठ लाखाच्या आत उत्पन्न असलेल्या सर्व समाजाला आरक्षण लागू केली असून कॉक्रोज जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके हे मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्याचे सुपुत्र असून त्यांनी दिल्ली येथे केलेले आंदोलन ही योग्यच प्रश्नावर केलेले आहेत त्यामुळे त्यांच्या सर्व मागण्या मोदी सरकारने मंजूर केलेले आहेत तसेच अ ब क ड च्या नावाखाली बौद्ध व मातंगवाद होऊ नये समाजातील अनुसूचित जातीतील सर्व समाजाला आरक्षणाचा लाभ मिळावा परंतु आरक्षण वर्गीकरणाच्या माध्यमातून बौद्ध समाजावर देखील अन्याय होता कामा नये याची दक्षता घेणे गरजेचे आहे मातंग समाजाला विकासाच्यासाठी आरटीओ लोकशाहीर आण्णाभाऊ साठे महामंडळाच्या माध्यमातून प्रशासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले तसेच रिपाई एके होणार असेल तर प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वातकाम करण्यात आनंदच होईल असेही ना.आठवले यांनी या वेळी पत्रकार परिषदेत सांगितले.

# ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाला शंभर टक्के आरोग्यसेवा द्या : मिन्नू पी. एम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** ग्रामपातळीवरील प्रत्येक नागरिकापर्यंत गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा प्रभावीपणे पोहोचवून शासनाने निश्चित केलेल्या उद्दिष्टांची शंभर टक्के पूर्तता करावी. आरोग्यविषयक विविध कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा किंवा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी दिला.



जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या वतीने तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांची मासिक आढावा बैठक १८ ऑगस्ट रोजी उपसंचालक कार्यालयाच्या सभागृहात मिन्नू पी. एम. यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानासह माता-बाल संगोपन, कुटुंब कल्याण, क्षयरोग, कुष्ठरोग, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजार नियंत्रण, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, डिजिटल आरोग्य सेवा आदींचा आढावा घेण्यात आला.

सहाय्यक उपसंचालक डॉ. दयानंद मोतीपवळे यांनी सरप्राईज व्हिजिट, माता-बाल आरोग्य सेवांची लवकर नोंदणी आणि शंभर टक्के सेवा, तसेच आयुष्मान भारत डिजिटल मिशनच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन केले.

ॲम्बुलन्स सेवा निधी, इंधन किंवा अन्य कारणांमुळे बंद पडू नये, यासाठी पूर्वनियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आरोग्य संस्थांनी गुणवत्ताविषयक राष्ट्रीय मानके पूर्ण करावीत, तसेच आवश्यक पायाभूत सुविधांसाठी उपलब्ध निधीचा नियमानुसार वापर करावा, असेही निर्देश देण्यात आले.

कुपोषित (एसएएम) बालकांवर विशेष लक्ष देऊन वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांनी आठवड्यातून किमान एकदा अंगणवाडी केंद्रांना भेट द्यावी, अशा सूचना देण्यात आल्या. माता-बाल आरोग्य, क्षयरोग शोध, बालविवाह प्रतिबंध, रक्तक्षय निर्मूलन आणि कुटुंब कल्याणाबाबत जनजागृती करण्यावरही भर देण्यात आला.

बैठकीस डॉ. शिवकुमार हलकुडे, डॉ. छाया आवरगांवकर, डॉ. विशाल बेंद्रे, डॉ. एस. शैलजा, डॉ. शेख शकील, डॉ. वैशाली पाटील यांच्यासह जिल्हा व तालुकास्तरीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

# खुलताबाद पंचायत समिती येथे नव्याने रुजू झालेले गट शिक्षण गटशिक्षणाधिकारी गोरक्ष गाजरे यांचा सत्कार



**खुलताबाद प्रतिनिधी :** खुलताबाद तालुका गटशिक्षणाधिकारी म्हणून नव्याने रुजू झालेले गोरक्ष गाजरे यांचा सभापती यांच्या दलना मध्ये सत्कार करताना संजय भाऊ खंडागळे गिरीश सोनार .गटविकास अधिकारी पंचायत समिती खुलताबाद. आर पी आय चे. खुलताबाद तालुका अध्यक्ष फकीरराव भाऊ भालेराव. पत्रकार संतोष करपे पाटील. व उपस्थित कर्मचारी

# जन्म-मृत्यू विभागाची सभापती अनिल मकरिये यांच्याकडून अचानक पाहणी

## नागरिकांच्या तक्रारींची घेतली दखल; कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू विभागात विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना होत असलेल्या त्रासाची दखल घेत स्थायी समितीचे सभापती अनिल मकरिये यांनी बुधवारी अचानक विभागाला भेट देत कामकाजाची पाहणी केली.

यावेळी सभापती मकरिये यांनी जन्म-मृत्यू प्रमाणपत्रासाठी आलेल्या नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. नागरिकांना प्रमाणपत्र मिळविताना येणाऱ्या अडचणी, अर्जांची प्रक्रिया, प्रलंबित प्रकरणे तसेच विभागाकडून दिल्या जाणाऱ्या सुविधांबाबत त्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली.

नागरिकांना शासकीय कामांसाठी विनाकारण हेलपाटे मारावे लागू नयेत, अर्जांची प्रक्रिया पारदर्शक व सुलभ असावी आणि प्रलंबित कामांचा तातडीने निपटारा करावा, अशा सूचना मकरिये यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच नागरिकांच्या



तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन त्यांचे प्रश्न वेळेत सोडविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

जन्म-मृत्यू विभागातील कामकाज अधिक गतिमान करण्यासाठी आवश्यक त्या प्रशासकीय उपाययोजना करण्याची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# लोनचे आमिष दाखवून महिलांना निर्जनस्थळी नेऊन लुटणारा आरोपी जेरबंद

## हर्सूल पोलिसांची कारवाई; दोन गुन्ह्यांची उकल, 8 लाख 18 हजार 700 रुपयांचा मुद्देमाल जप्त

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महिलांना कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवून मोटारसायकलवर बसवायचे आणि निर्जनस्थळी नेऊन धमकावत सोन्याचे दागिने लुटायचे, अशा प्रकारे महिलांना लक्ष्य करणाऱ्या आरोपीला हर्सूल पोलिसांनी शिताफीने अटक केली. नागोराव सुखदेव श्रीरामे (३०, रा. हनकदरी, ता. सेनगाव, जि. हिंगोली, ह.मु. एस.टी. कॉलनी, सुरेवाडी) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून हर्सूल व पुंडलिकनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन गुन्ह्यांमधील सोन्याचे दागिने आणि मोटारसायकल असा एकूण ८ लाख १८ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



२५ जुलै रोजी सकाळी सुमारे ११ वाजता सुमन रामदास औटी (४६, रा. गुरुचरन रेसिडेन्सी, हर्सूल) या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ उभ्या असताना आरोपीने त्यांना दोन लाख रुपयांचे कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर त्यांना मोटारसायकलवर बसवून नगर नाका पुलाच्या पुढे तिसगाव रोडवरील शेताजवळील निर्जनस्थळी नेले. तेथे दुपारी सुमारे १२.४५ वाजता धमकावत त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने लुटून आरोपी पसार झाला. याप्रकरणी १० ऑगस्ट रोजी हर्सूल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान हर्सूल पोलिसांच्या डी.बी. पथकाला आरोपी एस.टी. कॉलनी, सुरेवाडी परिसरात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. तो बाहेरगावी जाण्याच्या तयारीत असल्याचे समजताच पोलीस निरीक्षक स्वाती केदार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने तत्काळ कारवाई केली. पोलिसांना पाहताच आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी सुमारे दोन किलोमीटर पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. न्यायालयात हजर केल्यानंतर त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी मिळाली.

पोलीस कोठडीत चौकशी केल्यानंतर आरोपीने गुन्ह्याची कबुली देत लुटलेला मुद्देमाल पोलिसांच्या स्वाधीन केला. त्याच्याकडून १० ग्रॅम वजनाचा सुमारे १ लाख ३० हजार ७०० रुपये किमतीचा सोन्याचा नेकलेस, ४ तोळे ८ ग्रॅम वजनाचे सुमारे ६ लाख २४ हजार रुपये किमतीचे सोन्याचे गंठण आणि ४० हजार रुपये किमतीची होंडा शाईन मोटारसायकल जप्त करण्यात आली.

तपासात आरोपीने पुंडलिकनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतही अशाच पद्धतीने एका महिलेला लुटल्याचे समोर आले. वर्षा अरविंद सानप यांना सिडको पुलाजवळून मोटारसायकलवर बसवून अयोध्यानगर-कर्णपुरा परिसरातील निर्जनस्थळी नेण्यात आले होते. तेथे त्यांच्या कानातील सोन्याच्या रिंगा बळजबरीने हिसकावून घेण्यात आल्या होत्या. या गुन्ह्यातील २६ हजार रुपये किमतीच्या सोन्याच्या दोन रिंगाही पोलिसांनी हस्तगत केल्या.

# सोयगावच्या विद्यार्थ्यांनी अनुभवली कॅमेऱ्याच्या विश्व ; जागतिक छायाचित्रण दिनानिमित्त विद्यार्थ्यांना फोटोग्राफीच्या करिअरच्या संधींसह विविध पैलूंचे मार्गदर्श

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी
सोयगाव,दि.१९ ऑगस्ट

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे जागतिक छायाचित्रण दिन मोठ्या उत्साहात आणि नाविन्यपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. छायाचित्रण ही केवळ क्षण टिपण्याची कला नसून सर्जनशीलता,निरीक्षणशक्ती,तंत्रज्ञान आणि करिअरची संधी देणारे प्रभावी माध्यम आहे.याची विद्यार्थ्यांना यावेळी उत्स्फूर्तपणे जाणीव करून देण्यात आली. याप्रसंगी शाळेचे कला निदेशक विवेक महाजन यांनी विद्यार्थ्यांना छायाचित्रणाच्या विविध पैलूंची रंजक पद्धतीने माहिती दिली.फोटोग्राफीची सुरुवात विविध प्रकारचे फोटोग्राफी क्षेत्र,निसर्ग व प्राणी छायाचित्रण,न्यूज फोटोग्राफी, सामाजिक विषयांवरील छायाचित्रण तसेच दैनंदिन जीवनातील समस्या प्रभावीपणे मांडण्यासाठी छायाचित्रणाचा कसा उपयोग करता येतो,याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले."एक छायाचित्र हजार शब्द सांगू



शकते!" या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना छायाचित्रामागील विचार,निरीक्षण आणि संदेश समजावून सांगण्यात आला.तसेच फोटोग्राफी क्षेत्रातील करिअरच्या विविध संधी आणि प्रत्यक्ष अनुभव सांगत विद्यार्थ्यांच्या मनातील कुतूहलाला नवी दिशा देण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून, फोटोग्राफीविषयी त्यांची उत्सुकता अधिकच वाढल्याचे दिसून आले.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.कॅमेऱ्याच्या माध्यमातून निसर्ग,प्राणी,बातम्या,सामाजिक समस्या आणि आजूबाजूच्या जगाकडे नव्या दृष्टीने पाहता येते, हे विद्यार्थ्यांना समजले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि नव्या गोष्टी शिकण्याची उत्सुकता स्पष्टपणे दिसून आली.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या निरीक्षणशक्ती, कल्पनाशक्ती,सर्जनशीलता आणि अभिव्यक्ती कौशल्यांना चालना मिळाली.शालेय जीवनात अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना भविष्यातील विविध क्षेत्रांची ओळख करून देण्याचा एक सुंदर प्रयत्न यानिमित्ताने करण्यात आला.

याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक हरिदास काटोले, किरणकुमार पाटील,सुरेखा चौधरी,रामचंद्र महाकाळ, मंगला बोरसे,सविता पाटील,कोळी मॅडम,गणेश बाविस्कर, अंकुश काळे,अनिल देसाई,तानाजी चव्हाण,विकार, बागवान तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.जागतिक छायाचित्रण दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी केवळ फोटो काढण्याची कला नव्हे,तर जगाकडे बारकाईने पाहण्याची आणि प्रत्येक क्षणामागचा अर्थ शोधण्याची नवी दृष्टी आत्मसात केली.

# जि.प. उपकर योजनेतून कृषी अवजारांसाठी अनुदान; 11 सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**जालना :** जिल्हा परिषद जालना कृषी विभागामार्फत जिल्हा परिषद उपकर योजना सन २०२६-२७ अंतर्गत जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषी अवजारे अनुदानावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या योजनेअंतर्गत तालुकास्तरावर प्राप्त होणाऱ्या अर्जांमधून पात्र शेतकऱ्यांची जिल्हास्तरावर संगणकीय लॉटरी पद्धतीने निवड करण्यात येणार आहे.

योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना विविध कृषी अवजारांसाठी अनुदान देण्यात येणार आहे. यामध्ये २० पी.टी.ओ. एच.पी. व त्यापुढील ट्रॅक्टरसाठी किंमतीच्या ४० टक्के किंवा कमाल १ लाख २५ हजार रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान देण्यात येणार आहे. तसेच ट्रॅक्टरचलित रोटाव्हेटरसाठी किंमतीच्या ४० टक्के किंवा कमाल ३६ हजार ८०० रुपये, मानवचलित टोकरण यंत्र (Dibbler) साठी किंमतीच्या ५० टक्के किंवा कमाल ८ हजार रुपये, तर स्ट्रॉ चॉपर/श्रेडर/मल्चर माऊंटेड प्रकारासाठी किंमतीच्या ४० टक्के किंवा कमाल ५४ हजार रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान देण्यात येणार आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याजवळ स्वतःच्या नावावरील जमिनीचा ७/१२ व ८-अ उतारा, आधार कार्ड, बँक पासबुक तसेच ट्रॅक्टरचलित अवजारासाठी अर्जदाराच्या स्वतःच्या नावावर असलेले ट्रॅक्टरचे आर.सी. बुक असणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील इच्छुक शेतकऱ्यांनी संबंधित पंचायत समिती स्तरावर १९ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर या कालावधीत कार्यालयीन वेळेत ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावेत. योजनेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी होऊन उपलब्ध अनुदानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषद जालना येथील मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे तसेच कृषी विकास अधिकारी पी. बी. बनसावडे यांनी केले आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911